**१ जानेवारी, १९९५ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास)देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गवसु १२२०/प्र.क्र.२०४(१)/झोपसु-१**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांकः-११ जुलै २००१**

वाचा : १) शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र गवग १२२०/प्र.क्र११५/झोपसु-१, दि. ९ मार्च, २०००.

२) शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र. गवसु १२२०/प्र.क्र.२०४/झोपसु-१, दि. १७ नोव्हेंबर, २०००

३) शासन पत्र क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र.२०४/झोपसु १, दि. २८.११.२०००

**प्रस्तावना**

संदर्भाधिन शासन निर्णयानुसार झोपडपट्टीवासीयांचे सर्वेक्षण तथा गणना करुन पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे ज्या शहराची / नगराची लोकसंख्या १९९१ च्या जनगणनेनुसार ५०,००० वा त्यापेक्षा जास्त आहे अशा व ज्या महानगरपालिका / नगरपरिषद क्षेत्रामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम, १९७१ लागू करण्यात आलेला आहे त्या ठिकाणच्या पात्र झोपडीवासीयांना मुलभूत सुविधा पुरविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.सध्या राज्यातील ६१ शहरामध्ये / नगरामध्ये ही योजना लागू करण्यात आलेली असून त्या ठिकाणच्या पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्रे देण्यात येणार आहेत ( संबंधित ६१ महानगरपालिका/ नगर परिषद यांची यादी **परिशिष्ट "क"** सोबत जोडली आहे.)

२. ओळखपत्रे देण्यामागील शासनाची सर्वसाधारण भूमिका खालील प्रमाणे आहे :-

१) १ जानेवारी, १९९५ पूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडीत ओळखपत्रधारक रहात होता याचा ओळखपत्र हा एक पुरावा आहे.

२) ओळखपत्रधारकांचे शक्यतो निष्कासन केले जाणार नाही. परंतु शासनाला जेंव्हा आवश्यक असेल तेव्हा मात्र त्यांची पर्यायी व्यवस्था करुन शासनास त्यांचे निष्कासन करता येईल.

३) निधीच्या उपलब्धतेनुसार ओळखपत्रधारक रहात असलेल्या घोषित खाजगी जमिनीवरील किंवा राज्य शासनाच्या व राज्यशासनाच्या उपक्रमांच्या जमिनीवरील घोषणेस पात्र झोपडपट्टीत राज्य शासनातर्फे मूलभूत नागरी सुविधा पुरविल्या जातील आणि झोपडपट्टीवासियांना शासनाने वेळोवेळी विहित केलेली एकत्रित शुल्काची रक्कम, सेवा आकार, इत्यादि त्यांना भरावा लागेल.

उपरोक्त भूमिकेचा विचार करता ओळखपत्र देण्याचे धोरण अधिक स्पष्ट व परिणामकारी व्हावे म्हणून संदर्भाधिन शासन निर्णय दि. ९मार्च २०००, शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर,२००० व दिनांक २८ नोव्हेंबर, २००० चे पत्र अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

## शासन निर्णय

१. **योजनेचे नांव**

पात्र झोपडपट्टीवासीयांकरिता ओळखपत्र योजना - २००१

२. **योजनेची व्याप्ती**

(१) १९९१ च्या जनगणनेनुसार ५०,००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांच्या / नगरांच्या सोबतच्या परिशिष्ट-क मधील यादीतील ६१ महानगरपालिका / नगरपरिषद क्षेत्रामधील राज्य शासन,महानगरपालिका, नगरपरिषद, म्हाडा व अन्य निमशासकीय संस्था यांच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्ट्या आणि खाजगी जमिनीवरील ज्या झोपडपट्ट्या महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम १९७१ मधील तरतूदीअन्वये घोषित करण्यात आलेल्या आहेत अशा झोपडपट्ट्यांना ही योजना लागू राहील.

(२) राज्य शासन व राज्य शासनाच्या उपक्रमांच्या जमिनीवरील, खेळाचे मैदान, रीक्रीएशन ग्राऊंड, उद्यान, इत्यादि सार्वजनिक प्रयोजनासाठी असलेली आरक्षणे तसेच बांधकामास प्रतिबंध असणाऱ्या ( नॉन बिल्डेबल ) जमिनीवरील १.१.१९९५ पूर्वी पासून असलेल्या पात्र झोपडपट्ट्यांना ही योजना लागू राहील.

(३) रस्त्यावरील व पदपथावरील झोपड्यांना ही योजना लागू होणार नाही त्यांची गणना करण्यात येईल, परंतु त्यांना ओळखपत्र देण्यात येणार नाही.

तथापि,रस्त्यावरील व पदपथावरील या योजनेच्या पात्रतेच्या अटी पूर्ण करणारे रस्त्यावरील व पदपथावरील झोपडीधारक त्यांचे निष्कासन झाल्यास पर्यायी जागा मिळण्यास पात्र राहतील.

(४) २५ किंवा त्यापेक्षाही कमी झोपडया एकत्रितरित्या किंवा विखुरलेल्या अवस्थेत असल्यास त्यांना ही योजना लागू होणार नाही.

(५) ज्या झोपडपट्टयासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर केली असेल अशा झोपडपट्टयांना ही योजना लागू होणार नाही.

(६) समुद्र तटीय नियमन (सी.आर. झेड) अंतर्गत बाधित राज्य शासन व राज्य शासनाचे उपक्रम आणि घोषित खाजगी जमिनीवरील झोपडपट्टयांना ही योजना लागू राहील.

३. **या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्र होण्याकरिता झोपडपट्टीवासियांनी पूर्ण करावयाच्या अटी.**

१) झोपडपट्टीवासीयाचे नांव १ जानेवारी १९९५च्या मतदार यादीत असले पाहिजे व त्यावेळी अस्तित्वात असलेल्या ज्या झोपडीत तो रहात होता त्याच झोपडीत सदर झोपडपट्टीवासी आजही रहात असला पाहिजे.

**किंवा**

२) दिनांक १.१.१९९५ च्या मतदार यादीत झोपडपट्टीवासीयांचे नांव असले पाहिजे व खाजगी जमिनीवरील घोषित किंवा शासकीय / निमशासकीय जमिनीवरील घोषणेस पात्र झोपडपट्टीतील दिनांक १.१.१९९५ रोजी अस्तित्वात असलेल्या झोपडीत सदर झोपडपट्टीवासी रहात असला पाहिजे, परंतु ओळखपत्र देतेवेळी झोपडपट्टीवासी खाजगी जमिनीवरील घोषित किंवा शासकीय / निमशासकीय जमिनीवरील घोषणेस पात्र झोपडपट्टीतील दिनांक १.१.१९९५ ला अस्तित्वात असलेल्या ज्या झोपडीत रहात होता त्या झोपडीत तो रहात नसून खाजगी जमिनीवरील घोषित किंवा शासकीय/ निमशासकीय जमिनीवरील घोषणेस पात्र झोपडपट्टीतील दिनांक १.१.१९९५ पूर्वी अस्तित्वात असलेल्या इतर झोपडीत तो रहात असला पाहिजे.

३) धार्मिक,शैक्षणिक, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य निवासेतर तसेच संयुक्त वापरातील झोपडीबाबत, झोपडी असलेल्या पत्त्यावर व झोपडीवासियाच्या नांवावर दिनांक १.१.१९९५ पूर्वी दिलेला व यापुढेही चालू राहाणारा शासकीय, निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचा परवाना /लायसन्स ( ज्यामध्ये गुमास्ता लायसन्स, खानावळ व उपहारगृह लायसन्स, औद्योगिक परवाना यांचा समावेश असलेले ) अथवा वीज बिल, दूरध्वनी देयक इत्यादि ठोस पुरावे असले पाहिजेत.

**टीप :-** ज्या झोपडपट्टीवासीयांचे नांव दि. १.१.१९९५ च्या मतदार यादीत नाही परंतु ज्यांच्याकडे १.१.१९९५ पूर्वीचे झोपडी व वास्तव्याचे आवश्यक ते

ठोस / सबळ पुरावे ( उदा. वीज बिल, दूरध्वनी देयक, विक्रीकर, व्यवसाय कर, आयकर अथवा इतर करांचा भरणा केल्याचे पुरावे, शिधा-पत्रिका इ.) आहेत त्या झोपडपट्टीधारकांना ओळखपत्र देण्यात येईल.

४. **ओळखपत्रे देण्याकरिता अटी :**

(१) यापूर्वी कोणत्याही योजने अंतर्गत झोपडपट्टीवासीयांना दिलेली सर्व ओळखपत्रे ही योजना कार्यान्वित झाल्यावर (या योजनेअंतर्गत नवीन ओळखपत्रे देण्यात आल्यावर ) आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

(२) या योजनेच्या पहिल्या टप्प्यात २२५ चौ. फुट पर्यंत क्षेत्रफळ असलेल्या झोपडीतील पात्र झोपडपट्टीवासियांसच ओळखपत्र देण्यात यावेत. ज्या झोपडीचे क्षेत्रफळ २२५ चौ. फुटापेक्षा जास्त असेल अशा झोपडयांच्या क्षेत्राची प्रत्यक्ष मोजणी करुन दुस-या टप्प्यात त्यामध्ये वास्तव्यास राहणा-या झोपडपट्टीवासीयांस जास्तीत जास्त ५०० चौ. फुटापर्यंतच ओळखपत्र देण्यात यावेत. ओळखपत्र देतांना विना परवाना परमिट रुम, बियर बार, डान्सींग बार, रासायनिक गोदाम, प्रदूषण करणारे उद्योग, इत्यादींना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत. पात्र झोपडीधारकांकडे ५०० चौ. फुटापेक्षा निवासी / अनिवासी कामासाठी जास्त वापरात असलेली जागा योग्य वा आवश्यक असेल तेंव्हा कोणताही मोबदला न देता निष्कासित केली जाईल. जो पर्यंत ती जागा निष्कासित केली जात नाही तो पर्यंत एकत्रित शुल्क वसूल करण्यात यावा. पुनर्वसनासाठी पात्र क्षेत्राचा तसेच १.१.१९९५ रोजी वापरात असलेल्या अतिरिक्त जागेचा ओळखपत्रामध्ये उल्लेख करण्यात येईल.

(३) उपरोक्त विविध वापर असलेल्या ज्या झोपडयांचे (प्रत्येकी) क्षेत्रफळ ५०० चौ.फू. पेक्षा जास्त आहे त्या झोपडयांबाबत संबंधित ओळखपत्र धारकाने निवडलेल्या (रस्ता व पदपथाचे क्षेत्र वगळून) फक्त ५०० चौ. फू. पर्यंतचे ओळखपत्र त्याला देण्यात येईल. ५०० चौ. फू. पेक्षा अतिरिक्त बांधकाम जेव्हा योग्य वा आवश्यक असेल तेंव्हा कोणताही मोबदला न देता निष्कासित करण्यात येईल.

(४) १.१.१९९५ रोजी वा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ज्या पात्र झोपडयांचे एकत्रीकरण करुन नवीन झोपडया / इमारती बांधण्यात आलेल्या आहेत त्या सर्व झोपडया / इमारती बाबत संबंधित झोपडीचा इमारतीचा काही भाग किंवा क्षेत्र ज्या जमिनीवर बांधकाम वर्ज्य आहे, अशा जमिनीवर (उदा. रस्ता / पदपथ )असल्यास

तेवढा भाग / क्षेत्र वगळता, उरलेल्या क्षेत्रापैकी संबंधित ओळखपत्र धारकांने निवडलेल्या जास्तीत जास्त ५०० चौ. फू. क्षेत्रापर्यंतचे ओळखपत्र त्याला देण्यात येईल व उर्वरित अतिरिक्त असलेले बांधकाम जेव्हा योग्य वा आवश्यक असेल तेंव्हा, कोणताही मोबदला न देता, निष्कासित करण्यात येईल.

(५) झोपडयातील पोटमाळे वा मजले / माळे यामध्ये राहणा-या झोपडपट्टीवासीयांना स्वतंत्र / वेगळे ओळखपत्र देण्यात येणार नाही.

(६) झोपडपट्टीवासीयांकडून शासनाचे काही येणे असल्यास, १.१.१९९५ पासून पुढील कालावधीची थकबाकीची वसुली झाल्यानंतरच त्याना ओळखपत्रे देण्यात येतील.

(७) पात्र झोपडपट्टीवासियांकडून ओळखपत्र योजना २००१ अंतर्गत देण्यात येणारे ओळखपत्र हस्तांतरित करता येणार नाही.

५. **ओळखपत्राचा नमुना, प्राधिकृत अधिकारी, इत्यादि.**

१) बृहन्मुंबईतील झोपडपट्टीवासीयांच्या संदर्भात सर्वेक्षणाच्या प्रपत्राचा नमुना तसेच ओळखपत्राचा नमुना शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.सदर सर्वेक्षणाच्या प्रपत्राचा नमुना व ओळखपत्राचा नमुना आवश्यक त्या दुरुस्ती व सुधारणासह बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर शहरांमध्ये / नगरांमध्ये सर्वेक्षणासाठी व ओळखपत्रे देण्यासाठी वापरण्यात यावा. सोबत सर्वेक्षण प्रपत्राचा व ओळखपत्राचा नमुना **परिशिष्ट -"ख"** मध्ये जोडला आहे.

२) झोपडपट्टयांचे सर्वेक्षण तथा गणना करुन पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्रे देण्याची कार्यवाही विहित पध्दतीनुसार व कालावधीमध्ये पूर्ण करण्यात यावी. बृहन्मुंबईमध्ये अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे), मुंबई व मुंबई उपनगर यांच्या नियंत्रणाखाली झोपडी गणना मोहीम राबविण्यात आली असून त्यांनी शासकीय व निमशासकीय तसेच घोषित जमिनीवरील झोपडयांचे सर्वेक्षण केलेले आहे. त्यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व म्हाडाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे सर्वेक्षण केलेले अर्ज संबंधित संस्थेकडे तात्काळ पाठविण्यात यावेत.

३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व म्हाडाच्या जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासीयांना अनुक्रमे बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडामार्फत ओळखपत्रे देण्यात येतील आणि शासकीय व खाजगी घोषित जमिनी तसेच, अन्य सार्वजनिक उपक्रमांच्या जमिनीवरील पात्र

झोपडपट्टीवासीयांना जिल्हाधिकारी, मुंबई शहर/ जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेमार्फत ओळखपत्रे देण्यात येतील.

४) बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील शासकीय/ निमशासकीय/ खाजगी घोषित जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासियांना संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त, नगरपालिका / परिषद यांचे मुख्य अधिकारी ओळखपत्र देतील. बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात संबंधित जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार व देखरेखीखाली ओळखपत्र देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

**६. पात्र झोपडपट्टी वासियांकरिता ओळखपत्र योजना - २००१ अंतर्गत ओळखपत्रे देताना खालील प्रमाणे ओळखपत्र शुल्क, सेवाशुल्क, प्रशासकीय आकार, भूईभाडे व हस्तांतरण शुल्क वसूल करण्यात यावे.**

**६.(अ) पात्र झोपडपट्टीधारकांना ओळखपत्र देताना खालीलप्रमाणे ओळखपत्र शुल्क आकारावे :**

| ओळखपत्राचा प्रकार | महानगरपालिका क्षेत्र | नगरपालिका क्षेत्र |
|---|---|---|
| निवासी किंवा धार्मिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक इत्यादी संस्थात्मक वापर | रुपये २००/- | रुपये १००/- |
| वाणिज्यिक/ औद्योगिक वापर | रुपये ८००/- | रुपये ४००/- |
| संयुक्त वापर | रुपये ६००/- | रुपये ३००/- |

१. बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील तसेच, खाजगी मालकीच्या घोषित जमिनीवरील व सार्वजनिक उपक्रमांच्या जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासियांकडून ओळखपत्र शुल्क, जिल्हाधिकारी मुंबई शहर / जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा हे वसूल करुन ओळखपत्रांचे वाटप करतील व त्यांच्याकडे जमा झालेले ओळखपत्र शुल्क शासकीय कोषागारात जमा करतील.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व म्हाडाच्या जागेवरील पात्र झोपडपट्टीवासियांकडून अनुक्रमे बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडा ओळखपत्र शुल्क वसूल करतील व स्वतःकडे ठेवतील.

बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रातील शासकीय / निमशासकीय व खाजगी घोषित जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासियाना संबंधित महानगरपालिका आयुक्त / मुख्य अधिकारी ओळखपत्रांचे वाटप करतील व ओळखपत्रांचे शुल्क त्यांच्याकडे ठेवतील.

**६.(ब) पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देतांना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकीय आकार व भुईभाडे आकारावे व ते दि. १.१.१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसूल करण्यात यावे. या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहील:**

१) सेवाशुल्क ४० टक्के
२) प्रशासकीय आकार २० टक्के
३) भुईभाडे ४० टक्के

**बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रासाठी एकत्रित शुल्क :**

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई ( एकत्रित ) दर महा | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ.फू.पर्यंत | रुपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये १/- प्रति. चौ.फू. दरमहा |
| सांस्कृतिक,सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | -- | दरमहा रुपये ०.५० प्रति चौ.फू | |
| संयुक्त | २२५ चौ.फू.पर्यंत | रुपये २००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये १.५०/- प्रति चौ. फू. दरमहा |
| अनिवासी | २२५ चौ. फू.पर्यंत | रुपये ३००/- | अतिरिक्त क्षेत्रांसाठी रुपये २/- प्रति चौ. फू. दरमहा |

**टीप :-** वरील विवरणपत्रात नमूद केलेले क्षेत्र म्हणजे झोपडीधारकाच्या वापरात असलेले क्षेत्र यामध्ये मजला किंवा पोटमाळा याचा समावेश नाही. ओळखपत्र देताना पात्र झोपडपट्टीधारकाला त्याच्या वापरातील क्षेत्रापुरताच फोटोपास देण्यात येणार आहे. पोटमाळा, मजला / माळा यासाठी स्वतंत्र ओळखपत्र देण्यात येणार नाही.

**६. (क)** बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रा व्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीसाठी सेवाशुल्क,इत्यादि यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहील.

७. **सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार ( एकत्रित शुल्क वसूली )**

झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवीत असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसूल करुन त्यांच्याकडे जमा करावे.

पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना वर नमूद केलेल्या दराप्रमाणे दरमहा सेवाशुल्क, प्रशासकीय आकार व भुईभाडे आकारण्यात यावे व एकत्रित शुल्काची वसूली दि. १.१.१९९५ पासून करण्यात यावी.

एकत्रित शुल्काच्या वसुलीकरिता एकच यंत्रणा कार्यरत राहावी म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकत्रित रक्कमेची वसूली बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावी. महानगरपालिकेच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांकडून करण्यात आलेल्या एकत्रित शुल्काच्या वसुलीची रक्कम त्यांच्याकडे ठेवावी व शासनाच्या किंवा म्हाडाच्या जमिनीवरील वसूल करण्यात आलेल्या एकत्रित रक्कमेतील प्रशासकीय आकार व सेवाशुल्क वजा करुन उर्वरित रक्कम त्यांनी जमिनीच्या मालकीनुसार शासनाकडे किंवा म्हाडाकडे वर्ग करावी.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्यत्र संबंधित महापालिका / नगरपालिका / परिषद यांनी एकत्रित शुल्काची वसूली करावी व वरीलप्रमाणे जमा रक्कमेचे वाटप करावे.

महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन ) अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार ज्या झोपडपट्ट्या संपादित करण्यात आलेल्या आहेत अशा झोपडपट्ट्यांच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांसाठी ओळखपत्र योजना शासकीय जमिनीवरील झोपडपट्टीवासियां प्रमाणेच राबविण्यात यावी.

८. **खाजगी मालकीच्या घोषित जमिनीवरील पात्र झोपडपट्टीवासियांकडून करावयाची वसूली.**

क) घोषित खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीमध्ये सुविधा पुरविल्या असल्यास झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार व प्रशासकीय आकार याची वसूली महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल व वसूल झालेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा होईल.

ख) संपादित केलेल्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांकडून मुंबई महानगरपालिकेने एकत्रित शुल्काची वसूली करावी. या एकत्रित वसूलीपैकी सेवा शुल्क व प्रशासकीय आकार या पासून मिळणारी रक्कम महानगरपालिकेकडे राहील व भुईभाडयाची ४० टक्के महानगरपालिकेने रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी. हीच कार्यपध्दती बृहन्मुंबई व्यतिरिक्त अन्य ६० शहरांना लागू होईल.

९. **हस्तांतरण शुल्क :**

बृहन्मुंबईतील शासकीय जमिनीवरील दिनांक १.१.१९९५ पूर्वी, पात्र झोपडीचे हस्तांतरण झालेले असल्यास, झालेल्या हस्तांतरणास जिल्हाधिकारी, मुंबई शहर/ जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी मान्यता देवून झोपडपट्टीवासियांकडून हस्तांतरण शुल्काची वसूली त्यानी करावी . बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व म्हाडाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांकडून हस्तांतरण शुल्क अनुक्रमे महानगरपालिका व म्हाडा मार्फत वसूल करण्यात येईल व हस्तांतरण शुल्काची रक्कम ते त्यांच्याकडे जमा करतील. बृहन्मुंबई व्यतिरिक्त अन्य ६० शहरात हस्तांतरणाची मान्यता जमिनीची मालकी असलेल्या संस्थानी द्यावी व हस्तांतरण शुल्काची वसूली त्यानीच करावी.

हस्तांतरण शुल्क खालीलप्रमाणे वसूल करण्यात यावे.

| वापराचा प्रकार | क्षेत्र | हस्तांतरण शुल्क | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ. फू.पर्यंत | रुपये ५०००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये ४०/- प्रति चौ. फूट |
| वाणिज्यिक, औद्योगिक | २२५ चौ.फू.पर्यंत | रुपये १०,०००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये ८०/- प्रति चौ. फूट |
| संयुक्त | २२५ चौ. फू.पर्यंत | रुपये ७,५००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रुपये ६०/- प्रति. चौ. फूट |

१०. सर्व संबंधित प्राधिका-यांनी भुईभाडे व हस्तांतरण शुल्क हया पासून प्राप्त होणारा निधी झोपडपट्टी सुधार कार्यक्रमासाठी वापरावा.

११. पात्र झोपडपट्टीवासियांना दिलेले ओळखपत्र वैध राहण्यासाठी ओळखपत्रधारकाकडून शासन, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद यांना देय असलेली एकत्रित शुल्काची रक्कम संबंधित प्राधिका-याकडे नियमित भरणे ओळखपत्रधारकावर बंधनकारक राहील व त्याबाबतची नोंद वर्ष अखेर यासाठी ठेवण्यात येणा-या

ओळखपत्र नोंदवहीत घेण्यात येईल. सर्व संबंधित प्राधिका-यांनी ओळखपत्र नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे.

१२. पात्र झोपडपट्टीवासियांकरिता ओळखपत्र योजना २००१ अंतर्गत ओळखपत्र शुल्क, जमिनीचे भुईभाडे, हस्तांतरण शुल्क यापासून जमा होणारा निधी त्या त्या प्राधिका-यांनी त्यांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करावा.

१३. बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये जिल्हाधिकारी, मुंबई / जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व उर्वरित ६० शहर क्षेत्रातील संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व नगरपालिका, मुख्य अधिकारी यांनी या शासन निर्णयानुसार पात्र झोपडपट्टीवासीयांना ओळखपत्रे देण्याची मोहिम त्वरित सुरु करुन ती हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आंत पूर्ण करावी. झोपडपट्टी सुधार योजना राज्यातील ज्या नगरपरिषद क्षेत्रात लागू आहे ते नगरपरिषद क्षेत्र ज्या जिल्हयात येते अशा जिल्हयाच्या संबंधित जिल्हाधिका-यावर ओळखपत्र योजना - २००१ च्या अंमलबजावणीची जबाबदारी राहील.

१४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६६२/व्यय ३, दिनांक १६ जून २००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने.

११/७/२००१

( ल. दा. व्यास )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव.
५) मा. राज्यमंत्री (गृ.नि.) यांचे खाजगी सचिव
६) मा. मुख्य सचिवांचे खाजगी सचिव.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई ( लेखा व अनुज्ञेयता)लेखापरीक्षा
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर ( लेखा व अनुज्ञेयता)लेखापरीक्षा

मुविमं/१.१.१५ नौआर झो पीसी (मो.)

९) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व)मुंबई
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई
१४) सर्व विभागीय महसुल आयुक्त.
१५) सर्व जिल्हयांचे जिल्हाधिकारी
१६) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति.), मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई
१७) नियंत्रक अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, जुने जकात घर,फोर्ट, मुंबई- २३
१८) संचालक, नगर पालिका प्रशासन, मुंबई
१९) सर्व महानगरपालिका आयुक्त/ प्रशासक
२०) सर्व विभागीय आयुक्त.
२१) मुख्य अधिकारी, नगर परिषद
खामगाव/यवतमाळ/अकोला/ अकोट/ अचलपूर / कामठी / गोंदीया / भंडारा / चंद्रपूर / बल्लारपूर / वर्धा/ हिंगणघाट / भिवंडी / मालेगांव / मनमाड / धुळे / नंदुरबार / जळगांव / भुसावळ / अमळनेर/ चाळीसगांव /अहमदनगर / श्रीरामपूर / सातारा /कराड / इचलकरंजी / बार्शी / पंढरपूर / जालना/ लातूर/ उदगिर/परभणी/ बीड/ मीरा- भाईंदर/ परळी/ उस्मानाबाद/विरार आंबेजोगाई/रत्नागिरी / पुसद/ हिंगोली/ मलकापूर/ बुलढाणा/ कुळगांव बदलापूर/ पनवेल/ विरार
२२) मंत्रालयीन सर्व विभाग.
२३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्य मंडळाचे सर्व मुख्य अधिकारी
२४) सर्व उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) सहाय्यक संचालक लेखा, गृहनिर्माण विभाग, मुंबई
२६) निवड नस्ती,( झोपसु-१)